O/C

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

157

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे-१६**

( यापुढील पत्रव्यवहारासाठी खालील क्रमांक व दिनांक याचा उल्लेख करावा. )

( जागेच्या व इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

**हंगामी बांधकाम चालू करण्याकरिता दाखला**
**( कमेन्समेंट सर्टिफिकेट )**

सदरचे बांधकाम चालू करण्याचा हंगामी दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४/४५/५८/६९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४, व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ यातील तरतूदींप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथा चंबर्स, सेनापती बापट मार्ग,
पुणे - १६
जा.क्र. झोपुप्रा/३०५
दिनांक- ३०/७/२०१३

प्रति,

**मे. पलाश रिॲलिटर्स,**
**अरिहंत, ११८७/२६, घोले रोड,**
**शिवाजीनगर, पुणे-०५.**

द्वारे

आर्किटेक्ट- **श्री. जगदीश देशपांडे,**
**ए-१, सक्सेस चेंबर्स, १२३२ आपटे रोड,**
**पुणे-०४.**

यांस--

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, सन १६६६ ची कलमे ४४ / ४५ / ५८ / ६९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४ व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ पुणे महानगरपालिका सीमेतील **पुणे, शिवाजीनगर, (राम नारायण बंगला), फा. प्लॉ. नं. ५६० पार्ट, सि.स.नं. ११९७** या योजनेसाठी मोकळया जागेवर संक्रमण शिबिराचे बांधकाम करण्यासाठी झो.पु.प्रा. ला तुम्ही पत्र दिले. ते दि. २६/०७/२०१३ या दिवशी पोहोचले. त्यावरुन काम ~~नियमान्वीत~~ करण्यास खाली लिहिलेल्या सर्व अटींवर ( भाग १ ) व काही महत्वाच्या सूचनांवर ( भाग २ ) तुम्हास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

"स्थळप्रत"
30/7/2013

**उप अभियंता**
**झो.पु.प्रा. पुणे.**

(भाग १)

१) एकुण जागेपैकी नकाशात दर्शविल्या प्रमाणे उपलब्ध मोळया जागेत ४४ + ०२ = ४६ गाळे संक्रमणाकरिता बांधण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२) या नकाशाची व्याप्ती केवळ संक्रमण शिबीरासाठी गाळे बांधणेपुरती मर्यादित आहे.

३) तात्पुरता ट्रांझिट कँप, पुनर्वसन इमारतीस भाग भोगवटा प्रमाणपत्र पात्र झाल्यानंतर ३० दिवसात व अंतिम भोगवटा प्रमाण पत्र मागण्यापुर्वी विकसकांनी काढून टाकुन जागा पुर्ववत करणे आवश्यक आहे.

४) संक्रमण शिबिरातील लाभार्थींना जाणेयेणेसाठी पुरेसा रस्ता सोडणे तसेच करण्यात येणाऱ्या बांधकामामुळे धोका पोहचणार नाही. याची संपुर्ण व्यवस्था विकसकाने करणे बंधनकारक आहे.

५) इमारतीचे भोगवटापत्र देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचे अविशिष्ट सामान व राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. राडारोडा कोठे टाकावा याबाबत संबंधीत मनपाच्या घरपाडी विभागामार्फत मार्गदर्शन खाली कार्यवाही करावी.

६) नवीन बांधकाम सुरु करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती वृक्ष संवर्धन कायदा १९७५ च्या तरतूदींनुसार पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते याची नोंद घ्यावी.

७) मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास विकसक जबाबदार राहील.

८) कामगारांच्या सोयीसाठी जागेवर किमान पुरेशा संडास / मुता-या तात्पुरत्या स्वरुपाच्या बांधल्या पाहिजेत. जुने संडास व मोरी असल्यास या प्रमाणे संडास, मुतारी बांधण्याची गरज नाही.

९) सदर बांधकामाचा हंगामी उपयोग पुर्ण साध्य झाल्यानंतर सदरचे बांधकाम काढून घेऊन सदरची जागा पुन्हा पुर्ववत करणेची जबाबदारी अर्जदाराची राहील.

१०) सदर बांधकामानुसार बांधण्यात येणाऱ्या रहिवाशी गाळयांसाठी विहित नियमांनुसार पुरेशी स्वच्छतागृहे व पाणीपुरवठा व्यवस्था, विद्युत व्यवस्था, सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था करणे तसेच यामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

वरील संमतीपत्राप्रमाणे काम करताना नगररचना अधिनियम अगर त्यास अनुसरुन केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होता कामा नये.

वरील संमतीपत्रासंबंधी काही शंका असल्यास कामास आरंभ करण्यापूर्वी झो.पु.प्रा. कडे तसे कळवून स्पष्टीकरण करुन घ्यावे.

...tion Authority
...partment
...VED
...nchwad Area

१३०

155

९७
२४२

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला
## ( कमेन्समेन्ट सर्टिफिकेट )
## संबंधी काही महत्वाच्या विशेष सूचना
## ( भग -२ )

१) नवीन घरांच्या पुरोभागी सज्जा करताना विजेच्या किंवा इतर यांत्रिक तारा हालविणे झाल्यास त्याची जबाबदारी झो.पु.प्रा.वर नाही. यासंबंधी अर्जदाराने परस्पर संबंधीत खात्याची अगाऊ संमती घेण्याची व्यवस्था करावी.

२) सदर मिळकतीमधून जाणा-या पाण्याच्या ( विशेषतः पावसाच्या पाण्याच्या ) नैसर्गिक प्रवाहाचा मार्ग कोणत्याही परिस्थितीत बंद वा कमी वा बदल करण्याची संमती हया दाखल्याने दिलेली नाही.

३) सार्वजनिक मोकळे स्थळ अनाधिकाराने समाविष्ट केले आहे असे संबंधीत झो.पु.प्रा.च्या निदर्शनास आल्यास सदरचे बांधकाम पाडून स्थळ मोकळे करुन घेण्यात येईल. तसे करण्यास या संमतीपत्राने बाधा येत नाही. आणि यावेळी कोणतीही हानी झाल्यास झो.पु.प्रा. त्यास जबाबदार राहणार नाही.

४) प्लॉटलगतच्या लोकांना अथवा इतरांना तुमच्या कामापासून उपसर्ग किंवा दुस-या कोणत्याही प्रकारचा त्रास अगर हानी पोहोचू नये. याविषयीची जबाबदारी तुमच्यावर आहे. या संमतीपत्राने दुस-या कोणाच्या अधिकारास बाधा येत नाही आणि तुम्ही आपल्या अधिकाराबाहेर कोणतेही बांधकाम केल्यास त्याची जबाबदारी विकसकावर राहील.

५) हा दाखला संबंधीत मनपा अथवा झो.पु.प्रा.च्या सेवकांनी अथवा संरक्षकाने (पोलीसाने) पाहण्यास मागितला असता दाखविला पाहिजे तसा न दाखविल्यास संमतीपत्राविना काम चालू आहे असे समजले जाईल.

६) हा दाखला झो. पु. प्रा. ने लेखी आज्ञा दिली तर ती तुम्ही मान्य केली पाहिजे.

७) झो.पु.प्रा.च्या लेखी संमतीपत्राशिवाय नवीन विहीर, तलाव किंवा डबके, हौद अगर कारंजे खोदण्याचे अगर बांधण्याचे काम करता येणार नाही. गली ट्रॅप्स व उघडी गटारे यांना मच्छर प्रतिबंधक व्यवस्था केली पाहिजे. हौदात केरकचरा न जाईल अशी झाकणे व्यवस्थीतपणे बसवावीत. त्यास सुलभपणे काढता येईल असे मजबूत कुलूप जोडावे. तसेच त्याच्या ओव्हरफ्लो ( वर्किंग ) पाईपला चांगल्यापैकी वायरगॉझचे संरक्षण असावे. हद्दीवरील भिंतीवर फुटक्या बाटल्यांचे तुकडे बसवू नयेत. फ्लसिंग संडासचे अगर इतर संडासचे जोते नजीकच्या मध्यबिंदूपासून अगर इमारतीभोवतालच्या जागेपासून दोन फूट उंचीचे असावे.